| MHKO120000752026 | किरकोळ फौजदारी खटला क्र. ०७/२०२६<br>प्रमोद प्रकाश मोरेकर<br>वि.<br>रुपश रमेश मोरेकर |
| --- | --- |

**निशाणी क्र.१ व ४ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीने आरोपीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये कारवाई व्हावी याकरीता दिला आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जामध्ये फिर्यादीने असे कथन केले आहे की, फिर्यादी हे शिवडाव, ता. भुदरगड येथील रहिवासी आहेत. फिर्यादी यांचे बँक खाते बँक ऑफ इंडिया मध्ये आहे. फिर्यादी यांनी संबंधित खात्याच्या अनुषंगाने बँकेमार्फत पासबुक, ए.टी.एम., धनादेश देण्यात आले होते. सदर धनादेश क्र. ०२२३०१ पासून सुरू होतात. सदरचे पासबुक, धनादेश, ए.टी.एम., हे फिर्यादीने एका प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये ठेवले होते व त्यामध्ये फिर्यादीच्या वडीलांचे नावे घेतलेला एक कोरा स्टॅम्प देखील होता.

३. फिर्यादीने अर्जामध्ये पुढे असे कथन केले आहे की, फिर्यादी यांनी संबंधित पासबुक व पिशवीतील अन्य कागदपत्रे मिळून आली नाही, म्हणून, फिर्यादीने शोधाशोध केली व त्यानंतर फिर्यादीची पिशवी गहाळ अथवा चोरी झाल्याची खात्री फिर्यादीला झाली व त्यामुळे फिर्यादीने संबंधित पोलीस ठाण्याकडे दि.०५/०६/२०२५ रोजी लेखी तक्रारी अर्ज केला. तसेच, संबंधित बँकेकडे देखील दि.०४/०६/२०२५ रोजी तसे कळविले. फिर्यादीला आरोपीचे विद्वान विधिज्ञांमार्फत धनादेशाची मागणी नोटीस प्राप्त झाली व त्यावेळी असे समजले की, संबंधित धनादेशाची चोरी आरोपीने केली आहे व धनादेशाचा गैरवापर देखील केला. तसेच पाच धनादेश प्रत्येकी ५ लाख रक्कम टाकून त्याचा गैरवापर आरोपीने केला व धनादेश वटविण्याचा प्रयत्न केला. संबंधित फिर्यादीने आरोपीला कधीही दिला नव्हता, त्यामुळे, फिर्यादीने आरोपीविरुद्ध मा. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांचेकडे

दि.११/१०/२०२५ ला लेखी तक्रार पाठविली, परंतु, पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ३१६(२), ३२८(४), ३३६(३) व कलम ३३८ बाबत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.

४. फिर्यादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, दखलपात्र गुन्हा घडलेला आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे व त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्व्ये तपासाचे आदेश प्रथमदर्शनी देण्यात यावेत. तसेच त्यांनी युक्तिवादाच्या अनुषंगाने खालील न्यायनिर्णयावर या न्यायालयाचे लक्ष वेधले.

**Sadiq B. Hanchinmani Vs. State of Karnataka & Ors. 2025 DGLS(SC)1369** सदर न्यायनिर्णयामध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा प्रथमदर्शनी दखलपात्र गुन्हा घडलेला आहे असे दिसून येत असेल व खोटे कागदपत्र बनवले हे दिसून येत असेल तर अशा परिस्थितीमध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम १५६(३) चा आदेश करणे उचित आहे.

५. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) चा आदेश पारित करण्यापूर्वी संबंधित पोलीस स्टेशनचे म्हणणे मागविले, परंतु, पोलीस स्टेशनने म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे विना म्हणणे अर्ज त्यांचेविरुद्ध गुणदोषावर चालविण्यात येतो. तसेच जरी फिर्यादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतच्या धनादेशाचा गैरवापर आरोपीने केला व धनादेशाची चोरी झाली होती व त्याची तक्रार त्यांनी संबंधित पोलीस स्टेशनला दि.०५/०६/२०२५ रोजी दाखल केली होती. धनादेश न वटलयाची त्यांनी मागणी नोटीस दि.०१/१०/२०२५ रोजी मिळाली व त्यावेळी त्यांना सदरील धनादेश चोरी झाल्याची खात्री झाली, परंतु, असे जरी असले तरी प्रस्तुतची फिर्यादी ही फिर्यादीने न्यायालयामध्ये २९/०१/२०२६ रोजी दाखल केली आहे व फिर्याद दाखल करण्यास देखील फिर्यादीने विलंब केला आहे. या ही पलीकडे पराक्रम्य संलेख अधिनियम, १८८१ (Negotiable

Instrument Act, 1881) चे कलम ८ नुसार ज्या व्यक्तीच्या नावे धनादेश असतो व तो व्यक्ती हा त्या धनादेशाचा धारक आहे, असे समजले जाते व कलम ९ नुसार तो त्या धनादेशाचा धारक हा एखाद्या मोबदल्यासाठी तो धनादेश त्याच्याकडे आला (holder in due course) असे समजले जाते. याही पलीकडे संबंधित कायद्याचे कलम ११८(अ) नुसार जोपर्यंत विरुद्ध परिस्थिती सिद्ध होत नाही तोपर्यंत हे ग्राह्य धरले जाईल की, कोणताही धनादेश हा मोबदल्यासाठी दिला गेला आहे. तसेच, संबंधित कायद्याचे कलम १३९ नुसार जोपर्यंत विरुद्ध परिस्थिती सिद्ध होत नाही तोपर्यंत असे ग्राह्य धरले जाईल की, ज्या व्यक्तीच्या लाभामध्ये धनादेश दिला गेला होता तो धनादेश हा एखादे देणे बाकी असलेली रक्कम अथवा एखादे दायित्व फेडणेपोटी दिला होता, या बाबींचा विचार करता प्रथमदर्शनी आरोपीने फिर्यादीची फसवणूक केली व खोटे कागदपत्र बनविले व फौजदारी न्यासभंग केला या आरोपामध्ये तथ्य वाटत नाही. **Sadiq B. Hanchinmani** या न्यायनिर्णयातील प्रमाणाचा आदर राखुन या न्यायालयाचे असे मत आहे की, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाणात सांगितले प्रमाणे दखलपात्र गुन्हा घडला आहे, असे प्रथमदर्शनी वाटत नाही. त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये तपासासाठी प्रकरण पाठविण्यामध्ये तथ्य वाटत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करतो.

## आदेश

१. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १७५ (३) अन्वये तपासासाठी प्रकरण पाठविण्याची मागणी नामंजूर करण्यात येते.

२. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २२३ अन्वये फिर्यादीने त्याचे सत्यापन नोंदविणेकामी पुढील तारखेस हजर रहावे, असा निर्देश देण्यात येतो.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.04.04 19:59:17 +0530

(एन. डी. रुद्रभटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गारगोटी

**दिनांक :** ०४/०४/२०२६